CNR No. MHNB08000632023

## आदेश निशाणी क्र. ४ खाली

(तारीख १७.०८.२०२४ रोजी पारित केला)

सदरचा अर्ज अर्जदारांच्या वतीने कलम २३(१) कौटूंबीक हिंसाचार पासुन महिलांचे संरक्षण अधिनियम अन्वये अंतरिम आर्थिक सहाय्य आदेश मिळणेकामी वितंती करुन दाखल केलेला आहे.

२. अर्जदारांनी त्यांचे असे कथन केले आहे की, अर्जदार क्र. १ ही गैरअर्जदार क्र. १ यांची पत्नी आहे. अर्जदार क्र. १ व गैरअर्जदार क्र. १ यांचा विवाह दिनांक २४.११.२०१४ मध्ये त्यांचे समाजाचे रितीरिवाजानुसार झाले असुन अर्जदार क्र. १ यांना गैरअर्जदार क्र. १ यांचेकडुन अर्जदार क्र. २ जुनेद, अर्जदार क्र. ३ जुबेर, अर्जदार क्र. ४ उबैद, अर्जदार क्र. ५ शदाब व अर्जदार क्र.६ आलीया हे अपत्ये झाले आहेत. तसेच अर्जदार क्र. १ व गैरअर्जदार क्र. १ यांचेत पती पत्नीचे नातेसंबध आजही कायम अस्तित्वात आहे. गैरअर्जदार क्र. २ ते ६ हे गैरअर्जदार क्र. १ यांचे नातेवाईक आहेत. अर्जदार क्र. १ यांचे कथनानुसार गैरअर्जदार क्र. १ यांनी अर्जदार क्र. १ यांना काही दिवस चांगले नांदविले. त्यानंतर गैरअर्जदार क्र. १ यांचे वागण्यात फारक होऊन त्यांनी अर्जदार क्र. १ यांना मानसिक व शारिरीक त्रास देणेस सुरवात केली. त्यानंतर गैरअर्जदार क्र. १ हे

अर्जदार क्र. १ यांचे चारित्र्यावर संशय घेऊन त्यांना मारहाण करुन त्यांना हाकलून देत असत. अर्जदार क्र. १ यांचे आई वडील त्यांचे नेहमी समजुत घालुनत्यांना नांदणेस पाठवुन देत असत.

३. अर्जदार क्र. १ यांनी त्यांचे अर्जात पुढे असे कथन केले की, दिनांक १०.०७.२०२२ रोजी गैरअर्जदार क्र. १ यांनी मागील भांडणाची कुरापत काढुन अर्जदार क्र. १ यांना लाथाबुक्यांनी मारहाण करुन नेसत्या वस्त्रानिशी अर्जदार क्र. १ यांना घराबाहेर हाकलुन दिले त्यानंतर त्यांनी पोलीस स्टेशन येथे तक्रार दाखल केली त्यानंतर पोलीसांनी त्यांना महिला समुपदेशन केंद्र येथे तक्रार करणेसा सांगितली असता त्यांनी तेथे देखील तक्रार दाखल केली तसेच त्यांनी पोलीस महासंचालक मुंबई व विशेष पोलीस महानिरीक्षक नाशीक यांचेकडे देखील मोबाईलद्वारे अर्जदाखल करुन गैरअर्जदार यांचे विरुध्द कार्यवाही करण्याची विनंती केली. त्यानंतर ते त्यांचे अपत्यांसह त्यांचे माहेरी राहणेसाठी आले व तेव्हापासुन ते त्यांचे माहेरी विसरवाडी येथे त्यांचे अपत्यांसह राहु लागले.

४. त्यानंतर अर्जदार क्र. १ यांनी त्यांचे अर्जात पुढे असे कथन केले की, दिनांक ३०.१०.२०२२ रोजी गैरअर्जदार हे अर्जदार क्र. १ यांचे माहेरी आले व त्यांना त्यांचे घरात घुसून शिवीगाळ करुन मारहाण केली व नांदायला यायचे असेल तर दोन लाख रुपये घेऊन येण्याची धमकी दिली तसेच त्यांना तलाख देण्याची देखील धमकी दिली तेव्हा आजुबाजुचे लोकांनी त्यांना गैरअर्जदार यांचे तावडीतुन सोडविले. त्यानंतर त्यांनी दिनांक ०१.११.२०२२ रोजी त्यांचेवर झालेले कौटूंबिक हिंसाचारा बद्दल महिला दक्षता निवारण कक्ष नंदुरबार येथे तक्रार दाखल केली. गैरअर्जदार क्र. १ यांनी अर्जदार क्र. १ ते ६ यांचा त्याग केला असुन अन्न, वस्त्र, निवारा, औषधोपचार, शिक्षण व इतर जिवनावश्यक वस्तुंची कोणतीही पुर्तता केलेली नाही.

५. अर्जदार यांनी त्यांचे अर्जात पुढे असे कथन केले की, गैरअर्जदार क्र. १ हे मालेगांव येथे सोडा विक्री व कटलेरी व्यवसाय करतात व त्यांना त्यापासुन रक्कम रु.६०,०००/– प्रतिमहा इतके उत्पन्न मिळते. तसेच, गैरअर्जदार यांची मौजे मालेगांव येथे घरमिळकत व प्लॉट आहेत. गैरअर्जदार यांची परिस्थतीती अत्यंत श्रीमंतीची असुन गैरअर्जदार यांनी अर्जदारांचा कोणातही औषधोपचार, पालनपोषनची सोय केलेली नाही. अर्जदार क्र. १ हे त्यांचे माहेरी राहत असुन त्यांना गैरअर्जदार क्र. १ यांनी अर्जदार क्र. १ ते ६ यांना एकत्रीतरित्या प्रतिमहा रक्कम रु.३५,०००/– निर्वाहभत्ता/ पोटगी , घरभाडे म्हणुन रक्कम रु. ७,०००/– तसेच, गैरअर्जदार यांनी अर्जदार यांना दिलेले मानसिक व शारिरीक त्रासापोटी व त्यांचेवर केलेले कौटूंबिक अन्याया व अत्याचारासाठी रक्कम रु. १०,००,०००/– मिळणेची विनंती करुन सदरील अर्ज मंजुर करण्याची विनंती केली आहे.

६. गैरअर्जदार हे प्रकरणात हजर झाले व सदरील अर्जास निशाणी क्र. ११ प्रमाणे आपले लेखी म्हणणे दाखल केलेले असुन अर्जदाराचा अर्ज खोटा, बनावट, असल्याचे व त्यातील संपुर्ण मजकुर खोटा असल्याचे सांगितलेले आहे. याउलट अर्जदार क्र. १ यांना सुरवातीपासुनच गैरअर्जदार यांना उलटउत्तरे देत असुन घरातील कोणतेही कामे करत नसल्याचे कथन केले आहे. तसेच, अर्जदार क्र. १ यांचा संशयी स्वभाव असल्यामुळे गैरअर्जदार यांचेवर नेहमी संशय घेत असत व माहेरी पळ काढ असत. तसेच, अर्जदार क्र. १ यांनी स्वतहुन गैरअर्जदार क्र. १ यांचा त्याग करुन गैरअर्जदार क्र. १ यांचेसोबत नांदणेसाठी तयार नाही. तसेच, गैरअर्जदार क्र. १ यांचे उत्पन्न देखील कमी असुन ते सोडविक्री व कटलरीचे व्यवसायातुन वार्षीक रक्कम रुपये सत्तर ते एंशी हजार इतके

उत्पन्न कमवित असल्याचे त्यांनी त्यांचे म्हणणेत कथन केले आहे. तसेच, गैरअर्जदार क्र. १ यांनी अर्जदार क्र. १ यांना कधीही शिवीगाळ, मारहाण केलेली नाही. अर्जदार क्र. १ यांनी सदरचा खोटा अर्ज दाखल केला असुन तो नामंजुर करण्याची विनंती केलेली आहे.

७. कलम २३(१) कौटूंबिक हिंसाचारापासुन महिलांचे संरक्षण अधिनियम अन्वये सदर अधिनियमात नमुद अनुतोष अंतरीम स्वरुपात अर्जदाराचे हक्कात पारित करीता येतात त्याकरिता अर्जदारास शपथपत्र व अभिलेखावर उपलब्ध पुराव्यानुसार प्रथमदर्शनी अर्जदाराचा कौटूंबिक हिंसाचार झाला व अर्जदार ही कौटूंबिक हिंसाचारामुळे बाधीत व्यक्ती आहे हे न्यायालयास दाखवुन द्यावे लागते.

८. प्रस्तुत प्रकरणात अर्जदार क्र. १ यांचे कथन विचारत घेता प्रस्तुत अर्जामध्ये नमुद केलेल्या कौटूंबिक हिंसाचाराच्या घटना त्यांचे समवेत घडल्या हे दर्शविण्यासाठी त्यांनी त्यांचे प्रतिज्ञापत्र अभिलेखावर दिले आहे. सदरील एकंदरीत बाबी विचारात घेता प्रथमदर्शनी असे दिसुन येते की, अर्जदार क्र. १ यांचा कौटुंबिक हिंसाचार झालेला आहे. सद्यास्थितीत प्रथमदर्शी पुराव्याचे आधारे प्रस्तुतचा अर्ज निकाली काढणे आवश्यक आहे. प्रस्तुत प्रकरणात अर्जदार क्र. १ यांनी दिलेले त्यांचे शपथपत्र याद्वारे प्रथमदर्शनी गैरअर्जदार क्र. १ यांनी त्यांचा शारिरिक व मानसिक छळ केला व ते कौटूंबिक हिंसाचार बाधीत व्यक्ती आहे हे दर्शविले.

९. प्रस्तुत प्रकरणात अर्जदार क्र. १ यांना अनुतोष प्रदान करीत असतांना अर्जदार व गैरअर्जदार क्र. १ यांचे सोबत राहत असतांना त्यांचे जिवनमानाचा स्तर, आर्थिक उत्पन्न कसे होते ही बाब विचारत घ्यावी लागते. सदर अर्जात मागण्यात आलेले अनुतोष हे अंतरीम स्वरुपात असलेमुळे व प्रकरणात उभयपक्षकारांनी पुरावा देणेस सुरुवात न केलेमुळे उपलब्ध पुराव्यावरुन अर्जदार क्र. १ व गैरअर्जदार क्र. १ यांचे सोबत राहत असतांनाचे जिवनमानाचा स्तर व सद्यस्थितीतील गैरअर्जदाराचे आर्थिक उत्पन्न या बाबीचा विचार करुन रास्त स्वरुपात प्रकरणाचे सुनावणीदरम्यान अर्जदारांचे उदरनिर्वाहाची सोय व्हावी या उद्देशाने तात्पुरत्या स्वरुपात अंतरिम आर्थिक सहाय्य आदेश पारित करता येतो.

१०. प्रस्तुत प्रकरणात अर्जदारा क्र. १ यांनी गैरअर्जदार क्र. १ हे सोडाविक्री व कटलरी व्यवसाय करत असल्याचे कथन केले आहे. गैरअर्जदार क्र. १ हे प्रकरणात हजर होवून त्यांचे म्हणणे सादर केले व अर्जदारांचे कथने नाकारली आहेत. तसेच, गैरअर्जदार यांना सोडाविक्री व कटलरी व्यवसायातुन वार्षीक रक्कम रुपये सत्तर ते एंशी हजार कमवित असल्याची बाब त्यांनी मान्य केली आहे. यावरुन गैरअर्जदार क्र. १ यांचे स्वतःचे उत्पन्न असल्याचे प्रथमदर्शनी स्पष्ट होते.

११. प्रस्तुत प्रकरणात गैरअर्जदार क्र. १ यांनी अर्जदारांचा कौटूंबिक हिंसाचार केल्याचे प्रथमदर्शनी दिसुन येत असल्यामुळे व गैरअर्जदार यांचे आर्थिक उत्पन्नाचा विचार करिता प्रकरणाचे सुनावणीदरम्यान अर्जदारांचे हक्कात रास्त स्वरुपात अंतरीम आर्थिक सहाय्य याकरिता आदेश पारित

करणे योग्य आहे. अशा परिस्थितीत एकंदरित सर्व बाबी विचारात घेता मी पुढीलप्रमाणे आदेश पारित करित आहे..

## **आदेश**

| | |
|---|---|
| १. | अर्जदाराचा अर्ज अंशतः मंजुर करण्यात येतो. |
| २. | गैरअर्जदार क्र. १ शेख रियाज मोहम्मद यांनी अर्जदार क्र. १ सलमाबानो शेख रियाज मोहम्मद यांना व त्यांचे अज्ञान अपत्ये अर्जदार क्र. २ ते ६ यांना असे सर्वांकरिता मिळुन एकत्रीत रित्या रक्कम रु.३,०००/-(तिन हजार रुपये) अंतरिम निर्वाहभत्ता / पोटगी म्हणुन अर्ज दाखल तारखेपासुन द्यावेत. |
| ३. | अर्जदार क्र. १ सलमाबानो शेख रियाज मोहम्मद यांना गैरअर्जदार क्र. १शेख रियाज मोहम्मद यांनी घरभाडे म्हणुन रक्कम रु.१०००/- अर्ज दाखल तारखेपासुन द्यावेत. |
| ४. | सदर आदेशाची एक-एक प्रत प्रस्तुत प्रकरणातील उभयपक्ष यांना मोफत देणेत यावी. |

PANKAJ RAMDAS PHULARI
Digitally signed by PANKAJ RAMDAS PHULARI
Date: 2024.08.22 15:50:24 +0530

नवापूर
तारीख १७.०८.२०२४

**(पंकज रा. फुलारी)**
न्यायदंडाधिकारी प्रथम वर्ग,
नवापूर.

**<u>दाखला</u>**

दाखला देण्यात येतो की, पी.डी.एफ. फाईलमधील मजकूर हा मुळ आदेशाप्रमाणेच आहे.

| | | |
|---|---|---|
| लघुलेखकाचे नांव | – | मयुर नंदकिशोर अहिरराव,<br>लघुलेखक (श्रेणी–३), |
| न्यायालयाचे नांव | | न्यायदंडाधिकारी प्रथम वर्ग, नवापूर, |
| आदेश जाहीर केल्याचा तारीख | – | १७.०८.२०२४ |
| आदेशावर न्यायाधीशांनी स्वाक्षरी केल्याची तारीख | – | १७.०८.२०२४ |
| आदेश अपलोड केल्याची तारीख | – | २२.०८.२०२४ |